जि.प.शिक्षक संवर्गातील
सर्वसाधारण बदल्या प्राधान्य

जा.क्र.बुजिप/शिप्रा/प्रास्था/ 10749 /2018
जिल्हा परिषद, बुलडाणा
शिक्षण विभाग ( प्राथमिक )
दिनांक 30/01/2018

प्रति,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती-------------(सर्व)

विषय :- जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांचे जिल्हांतर्गत बदल्यासाठी बदलीस पात्र शिक्षकांच्या/बदली अधिकार प्राप्त याद्या प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ :- 1.कक्ष अधिकारी ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक जिपब/4818/प्र.क्र.4/2017/आस्था-14 दिनांक 11/01/2018
2. य कार्यालयाचे पत्र क्रमांक 10352/2018 दि.15/01/2018

शासनाने दिनांक 27/02/2017 च्या शासन निर्णयान्वये तसेच दिनांक 15/04/2017 व दिनांक 17/05/2017 आणि दिनांक 31/05/2017 च्या शुध्दीपत्रकान्वये जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्याबाबत सुधारीत धोरण निश्चीत केलेले आहे. बदली अधिकार प्राप्त शिक्षकांना त्यांच्या पसंतीच्या शाळेच्या प्राधान्यक्रम नोंदविण्याच्या दृष्टीने तसेच त्यानुषंगाने बदली होणा-या शिक्षकांना त्यांना त्यांचा पसंतीक्रम नोंदविण्याच्या दृष्टीने बदलीस पात्र शिक्षकांच्या (सर्वसाधारण करीता 10 वर्ष पुर्ण आणि अवघड क्षेत्रात 3 वर्ष पुर्ण ) याद्या प्राप्त माहितीनुसार जेष्ठता लाऊन प्रसिध्द करण्यात येत आहे. शासन निर्णय दिनांक 2702/2017 नुसार कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.तसेच खालील बाबी शिक्षकांच्या लक्षात आणुन देणे गरजेचे आहे.

1. सरल वर नोंदविलेल्या माहितीच्या आधारावर बदल्या होणार आहेत.
2. सरल मधील माहिती स्वत: तपासणे व दुरुस्तकरुन घेणे ही शिक्षकाची वैयक्तीक जबाबदारी असेल.

उपरोक्त बाबी संबंधित शिक्षकांना माहिती करुन व सरल वर दुरुस्तीकरुन सोबत जोडलेल्या यादीवरील हरकती व आक्षेप नोंदविणेकरीता दिनांक 31/01/2018 रोजी दुपारी 12.30 पर्यंत न चुकता संबंधित आस्थापना लिपीक व गटशिक्षणाधिकारी यांनी या कार्यालयाकडे सादर करावी. ~~तसेच~~ सदर यादी जि.प.बुलडाणा च्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सहपत्र :- संवर्ग व माध्यम निहाय याद्या
(TUC/TBR)

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, बुलडाणा